# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bideo Road.Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६१२ दिनांक २५.०७.२०२०

## तलासरी पोलीस ठाणे हद्दीतील रिसॉर्ट मध्ये जुगार खेळणा-या आरोपीत यांचेवर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे पथकाची कारवाई

दिनांक २४/०७/२०२० रोजी रात्री २३.१५ वाजता श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर यांना तलासरी पोलीस ठाणे हद्दीतील मौजे काजली गावचे हद्दीत असलेल्या ग्रीन पार्क रिसॉर्ट येथे तीन पत्ता नावाचा जुगाराचा मोठा धंदा चालतो अशी खात्रीशीर बातमी मिळाली होती. मिळालेल्या माहीती अनुषंगाने दिनांक २५/०७/२०२० रोजी सकाळी ०२.३० वाजता मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली छापा टाकला असता. ग्रीन पार्क रिसॉर्टचे मालक यांनी स्वत:चे फायदयाकरिता त्याचे रिसॉर्ट मधील गेम हॉलची जागा खेळण्यासाठी देवुन तेथे आरोपीत क्रमांक १ ते २३ यांना विनापरवाना दमण बनावटीची दारु, गुटखा, तंबाखु तसेच जुगाराची साधणे उपलब्ध करुन दिल्याने तीन पत्ती नावाचा जुगार पैसे लावुन खेळत असतांना मिळुन आले. आरोपीत क्रमांक १ ते २३ यांना ताब्यात घेऊन त्यांची झडती घेतली असता १) ७३,२०२/- रुपये रोख रक्कम २) ४,८००/- रुपये किंमतीचे ४ लाकडी टेबल, तसेच सदर हॉलची झडती घेतली असता १) ७,६८०/- रुपय किंमतीचे पोलीस आय कॅट चे १६ बॉक्स, एका बॉक्स मध्ये १२ पत्याचे कॅंट, २) ३,५००/- रुपये किंमतीचे सेल इन दादरा नगर हवेली बनावटीचे सिगनेचर रिअर व्हिसीकीच्या ७ बॉटल, ३)२,५००/- रुपये किंमतीच्या ROCKFORD CLASSIC च्या ५ बॉटल, ४) २३,७६०/- रुपये किंमतीचे HAYWARDS 5000 सुपा स्ट्रॉंग बिअरचे १८ बॉक्स, एका बॉक्स मध्ये २४ टिन, ५)३,६९६/- रुपये किंमतीचे रॉयल स्ट्रगच्या एकुण ९६ बॉटल, ६) २,७६०/- रुपये किंमतीच्या बडवायझार मॅग्नम च्या एकुण १२ बॉटल, ७)५,२८०/- रुपये किंमतीच्या विमल पानमसाल्याचे ४४ पॅकेट, ८) ८,००/- रुपये किंमतीचे मिराज तंबाखुचे ४ पॅकेट, ९)१,३८०/- रुपये किंमतीचे व्ही-१ तंबाखुचे ४६ पाऊच, १०) ४,००/- रुपये किंमतीचे ३० नंबर बिडी २ बॉक्स, ११) २,००/- रुपये किंमतीचे सायना सुपर बिडीचा १ बॉक्स, १२) १०४५/- रुपये किंमतीचे छोटा गोल्ड फ्लॅगचे ११ पॅकेट असा एकुण १,३१,३०३/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत यांचे विरुध्द तलासरी पोलीस ठाणे येथेमहाराष्ट्र जुगार कायदा कलम ४ व ५ तसेच मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई), भा.दं.वि.सं.कलम २७२, २७३, २६९, २७०, १८८, १०९, ३४ सह अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ चे कलम २६(२), ४, ३०(२)(ए) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१(ब) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक पालघर यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पोनि/सुधीर संखे, सपोनि/सर्जेराव कुंभार, सपोनि/अनिल रायपुरे, पोउपनि/गणेश कांदेकर, पोउपनि/सचिन नावाडकर, स.फौ/जोशी, पोहवा/११४६ काचरे, पोना/१०५५ धारणे, पोशि/२६४३ राहुल पानसरे, पोशि/१५१० बाळु चव्हाण, पोशि/गुजर, पोशि/१८१९ संदीप राजगुरे, पोशि/१८३० जाधव, पोशि/१३९९ राठोड, पोशि/३५४ काजळे, पोशि/३०५ दराडे, मपोशि/भुरकुड यांनी केली आहे.

Scanned with CamScanner